# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला,
एक्सप्रेस टावर्स,
नरिमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२१.

दूरध्वनी : २०२ ६२४९
२०२ ५३५४
२८३ ५२४७
फॅक्स : २०२ ९३४८
एस.टी.डी : ०२२
ग्राम : पाणी मंडळ, मुंबई.

जा.क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/३५०/ 2674

दिनांक : २२.६.२०००.

**परिपत्रक क्र. ४५**

विषय : जलशुध्दीकरण केंद्रांची देखभाल व दुरुस्ती.

ज्या शहरांच्या पाणी पुरवठा केंद्रांची देखभाल व दुरुस्ती जोपर्यंत प्राधिकरणाकडून करण्यात येते, तोपर्यंत त्या शहरांतील जनतेला शुध्द व निर्जंतुक पाण्याचा पुरवठा करणे ही प्राधिकरणाची प्राथमिक जबाबदारी आहे. याचाच अर्थ पाणी पुरवठा केंद्रांची देखभाल व दुरुस्ती याबाबत संबंधित अधिका-यांनी सतर्क राहणे अपेक्षित आहे. या अनुषंगाने वेळोवेळी सूचनाही निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तथापि सर्व साधारणपणे असा अनुभव येत आहे की, जलशुध्दीकरण केंद्राच्या देखभाल व दुरुस्तीकडे जेवढया प्रमाणात लक्ष दिले पाहिजे तेवढे दिले जात नाही. ही बाब अतिशय गंभीर आहे.

या अनुषंगाने आपल्या निदर्शनास आणण्यात येते की, सुकथनकर समितीने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून देखभाल व दुरुस्ती करण्यात येणा-या एका मोठया जलशुध्दीकरण केंद्रास भेट दिली असता त्याठिकाणी देखभाल व दुरुस्तीकडे पुरेसे लक्ष न दिल्याने आढळलेल्या त्रुटींबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली असून सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनीही ही बाब गंभीर असल्याचे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

उपरोक्त विवेचन लक्षात घेवून आपणास सूचीत करण्यात येते की, जलशुध्दीकरण केंद्रामधील एखादे उपांग उदा.फ्लॅशमिक्सर, क्लॅरीफायरचा एखादा भाग, मिटर्स इत्यादि बंद झाल्यास त्याची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी. शुध्द पाण्याच्या टाकीवरील झाकण्यांना गंज लागू नये यासारख्या बाबींकडे देखील प्राधान्याने व विशेषत्वाने लक्ष देणे आवश्यक आहे याचे विस्मरण होऊ नये. पाणी पुरवठा केंद्राच्या कार्यक्षमतेवर जनतेचे आरोग्य अवलंबून असते व त्यामध्ये थोडे जरी दुर्लक्ष झाले तरी अनर्थ होऊ शकतो याची आपणा सर्वांना कल्पना आहेच. असे असतानाही देखभाल दुरुस्तीकडे पुरेश्या गांभीर्याने लक्ष न देणे हे खेदजनक आहे याची आपण नोंद घ्यावी. मुख्य अभियंता / अधीक्षक अभियंता / कार्यकारी अभियंता यांच्या अखत्यारीतील पाणी पुरवठा योजनांना वेळोवेळी ज्या भेटी देतात त्यावेळी त्यांनी जलशुध्दीकरण केंद्रास आवर्जून भेट दयावी व देखभाल दुरुस्तीच्या अनुषंगाने जलशुध्दीकरण केंद्राचा आढावा घेवून आढळणा-या त्रुटींबाबत नोंद करुन सत्वर उपाय योजना करावी, जेणेकरुन पाणी पुरवठा केंद्राची निगा योग्य राखली जाईल.

उपरोक्त सूचनांचे काटेकोरपणे पालन व्हावे. यामध्ये हलगर्जीपणा झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित कार्यकारी अभियंत्यास (स्थापत्य /यांत्रिकी/ विद्युत) जबाबदार धरण्यात येवून त्यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी. प्रशासनास कटु कार्यवाही करावी लागू नये याची दक्षता सर्वांनी घ्यावी.

(सही)

(राजेंद्र सगणे)
सदस्य सचिव (तांत्रिक)

**प्रत,**

मा.मंत्री, ग्रामीण विकास व पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे माहितीसाठी.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे माहितीसाठी.
सदस्य सचिव (प्रशासन), म.जी.प्रा., मुंबई यांचे माहितीसाठी.
विशेष कार्य अधिकारी व मुख्य अभियंता, म.जी.प्रा. नवी मुंबई यांचे माहितीसाठी.
सर्व मुख्य अभियंता, म.जी.प्रा. माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई यांना माहितीसाठी.
मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई यांना माहितीसाठी.
सर्व अधीक्षक अभियंता, म.जी.प्रा मंडळ, यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
सर्व कार्यकारी अभियंता, म.जी.प्रा.बां.विभाग क्र. यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.
सर्व उप विभागीय अधिकारी / अभियंता, म.जी.प्रा. बांधकाम उप विभाग, यांना माहितीसाठी व कार्यवाहीसाठी.

एनएनजी,.४१